**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२५ / २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.दुर्गेश पंजाबराव सोळंके,
मु.पो. मोखड, ता.नांदगांव खंडेश्वर,
जि.अमरावती.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदगांव खंडेश्वर,
जि.अमरावती.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, पुर्व माध्यमिक मराठी शाळा,
मोखड, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.दुर्गेश पंजाबराव सोळंके हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदगांव खंडेश्वर श्री.राम माधवराव हळदे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, पुर्व माध्यमिक मराठी शाळा, मोखड श्री. एन.एन. शिंगणापुरे हे हजर आहेत.

अर्जदाराला अपिलादरम्यान माहिती पुरविली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार माहिती संशयास्पद आहे. तरी, अर्जदाराला जी माहिती पुरविली ती माहिती मुळ अभिलेखाप्रमाणे सत्य आहे अशी माहिती लेखी स्वरुपात आजपासुन ८ दिवसाचे आंत देण्यात यावी.

**वरील सुचना व आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२८/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.अनिल रामदास चावरिया,
न्यु रमेश नगर, डाबकी रोड,
अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विज निर्माण कंपनी,
(स्थापत्य बांधकाम मंडळ) विदयुत नगर पारस,
ता.बाळापुर, जि. अकोला ४४४००२.

२. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, महाव्यवस्थापक कार्यालय,
स्थापत्य बांधकाम मंडळ,
महाराष्ट्र राज्य विज निर्माण कंपनी, मर्यादीत
पारस विदयुतनगर,
ता.बाळापुर, जि. अकोला

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज निर्माण कंपनी , (स्थापत्य बांधकाम मंडळ) पारस, श्री.रत्नाकर गणपत भुरे, हे हजर आहेत.

तक्रार क्रमांक ४०९/०१/२०१० मध्ये दिनांक २१/०४/२०१० रोजी हया आयोगाने आदेश दिला व त्यात अर्जदार श्री.अनिल रामदास चावरिया यांनी दिनांक ०९/०२/२०१० रोजी माहिती पुरविल्या संबंधी पोच दिली व त्यात कुठलीच तक्रार शिल्लक राहीली नाही असे लिहुन दिले. तसेच अर्जदाराने या आधी सुध्दा दिनांक २२/०१/२०१० रोजी तक्रार दाखल केली होती व त्यावरील सुनावणीचे दिवशी अर्जदार गैरहजर होते. तसेच सदर अपिल क्रमांक १२८/२०१० मधील आज सुनावणीचे दिवशी सुध्दा अर्जदार गैरहजर आहे व अर्जदाराला जी माहिती पुरविली ते प्रपत्र ‘अ’ व हया अपिलातील प्रपत्र हे एकच असुन अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदाराचे समाधान झाल्यामुळे अर्जदार गैरहजर राहिले असावे असा निष्कर्ष काढण्यात येतो. अर्जदार गैरहजर असुन अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली आहे.

**वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२६/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.अरुण केशवराव येवतेकर,
शिवराज अपार्टमेंट, ओम सोसायटी,
जगदंब मंदीरापुढे, गोरक्षण रोड, अकोला ४४४००४.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
अकोला जि.अकोला.

**२.** जन माहिती अधिकारी तथा
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
अकोला, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.अरुण केशवराव येवतेकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अकोला श्री. सि.आर. बोरसे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

अर्जदाराला दयावयाची माहिती आज रोजी तयार असुन सदरची माहिती अर्जदाराला आज रोजी पुरविण्याचे उत्तरवादी यांनी कबुल केले आहे परंतु त्यावर कुठलाही सही / शिक्का नसल्यामुळे हया आयोगासमोर आज रोजी अर्जदाराला माहिती हस्तांतरित करता आलेली नाही. अपिलीय अधिकारी श्री. सि.आर. बोरसे यांनी अर्जदाराला माहिती उशिरा दिल्या गेली ही बाब आजचे सुनावणीचे वेळी मान्य केली. तरी, सदरची माहिती सही /शिक्क्यानिशी अर्जदाराला २ दिवसाचे आंत पुरवितील. तसेच माहिती उशिरा दिल्यामुळे नुकसान भरपाई म्हणुन संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने आजपासुन ६ आठवडयाचे आंत २०००/- रु. नुकसान भरपाई अर्जदाराला दयावी व सदरची रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत अपिलीय अधिकारी निर्णय घेतील.

**वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १३०/ २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.ॲड.एस.ए. रऊफ,
रा.मोहनपुरा, मलकापुर, ता.मलकापुर,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बुलडाणा, जि.बुलडाणा.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बुलडाणा, जि.बुलडाणा.

**३.** जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, झेड-ए. उर्दु हायस्कुल,
मलकापुर, ता.मलकापुर जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.ॲड.एस.ए. रऊफ हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.एस.ए. सोनुने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झेड-ए. उर्दु हायस्कुल, मलकापुर श्री.शब्बीर खान मुसा खान हे हजर आहेत.

अर्जदार यांना याआधी दुसरा अर्ज दिनांक १८/०९/२००७ नुसार माहिती प्रदान करण्यात आली आहे. ती माहिती २००५-०६, २००६-०७ तसेच २००१ पासुन २००५-०६ पर्यंत नावासहीत माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच जुलै २००७ पासुन २७ जुलै २००९ पर्यंत ज्या नविन शिक्षकांच्या नेमणुका केलेल्या असेल त्या शिक्षकांच्या नावासहीत व अप्रुवल मिळाले असल्यास त्या अप्रुवलची माहिती अर्जदाराला देण्यात आली नाही ही बाब मुख्याध्यापक यांनी मान्य केली आहे व ते माहिती देण्यास तयार आहे. तसेच २०००-२००१ पासुन जुन २००७ पर्यंत जी दिनांक १८/०९/२००७ नुसार अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली त्यात ज्या शिक्षकांची नांवे आहे त्या शिक्षकांच्या बद्दल जिल्हा परिषद, शिक्षण विभाग यांनी दिलेल्या अप्रुवलच्या प्रती व शिक्षकांच्या मान्यतेकरिता पाठविलेल्या प्रस्तावाच्या प्रती पुरविण्यात आल्या. तसेच दिनांक ३०/०७/२००९ च्या अर्जानुसार मुद्दा क्रमांक २,३,४ माहिती मुख्याध्यापक यांनी आणलेली आहे व त्यांच्या स्वाक्षरीने सर्व माहिती देण्यास तयार आहे. सदरची माहिती अर्जदाराने तपासुन पहावी व त्यानंतर ज्या माहिती बद्दल शंका असेल किंवा माहिती अर्धवट आहे असे वाटत असल्यास कलम १८ खाली हया आयोगासमोर तक्रार करावी. संपुर्ण माहिती विनाशुल्क हया आयोगासमोर देण्यात येत आहे. सदर प्रकरणात माहिती ही देण्यात आली. सध्या कार्यरत असलेले मुख्याध्यापक यांचे म्हणण्यानुसार तत्कालीन मुख्याध्यापक यांचे कालावधीत हा अर्ज आला होता व ते सदर प्रकरणात ३ -४ महिने कार्यरत होते परंतु त्यांनी माहिती दिलेली नाही. तरी त्याबाबत त्यांना दोषी ठरविण्यात येवुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची शास्ती कलम २०(२) प्रमाणे लावण्यात येते व त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

**आदेश**

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. बुलडाणा यांनी सदर प्रकरणात शिस्तभंगाची कारवाई नियमानुसार करावी व तसा अहवाल ३ महिन्याच्या आंत या आयोगास सादर करावा.

२. हया आयोगासमोर अर्जदाराला सध्या कार्यरत असलेले मुख्याध्यापक यांनी १०१ पानाची जी माहिती पुरविलेली आहे ती माहिती अर्जदार तपासुन घेतील व त्यानंतर अर्जदार सदरची माहिती अपुर्ण व चुकीची असल्यास हया आयोगासमोर कलम १८ खाली तक्रार करु शकतात.

**वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १३१/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
ॲड.एस.ए. रऊफ,
रा.मोहनपुरा, मलकापुर, ता.मलकापुर,जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.** प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा,
जि.बुलडाणा.

**२.** जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, झेड-ए. उर्दु हायस्कुल,
मलकापुर, ता.मलकापुर जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी ॲड.एस.ए. रऊफ हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.एस.ए. सोनुने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, झेड-ए. उर्दु हायस्कुल, मलकापुर श्री.शब्बीर खान मुसा खान हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार दिनांक २७/०७/२००९ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, बुलडाणा यांचेकडे अर्ज केला होता व त्यात झेड-ए. उर्दु हायस्कुल मलकापुरचे हेडमास्तर यांना मासुमिया उर्द एज्युकेशन सोसायटी मलकापुरचे कथीत पदाधिकारी यांनी दिलेल्या (शो कॉज) कारणे दाखवा नोटीसची माहिती मागितली. त्या संबंधी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला पत्र दिले व त्याची एक प्रत मुख्याध्यापक, झेड-ए. उर्दु हायस्कुल, मलकापुर यांना देण्यात आली व त्यात मासुमिया उर्दु एज्युकेशन सोसायटी , मलकापुर या शाळेचे मुख्याध्यापक यांना आपल्या म्हणण्यानुसार सोसायटीच्या कथीत पदाधिका-यांनी बेकायदेशिर मुख्याध्यापक म्हणुन झेड-ए. उर्दु हायस्कुल व ज्युनियर कॉलेज, मलकापुर यांना त्यांचे पदावरुन काढणे बाबत एक कारणे दाखवा नोटीस दिल्याचे म्हटले आहे. सदरच्या शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असल्यामुळे आपणांस हवी असलेली कारणे दाखवा नोटीस त्यांचेकडुन उपलब्ध करुन घ्यावी असे म्हटले आहे. ते पत्र दिनांक ३१/०७/२००९ रोजीचे असुन त्याचा पत्र क्रमांक ५०३४/२००९ असा आहे. सदर शाळेचे मुख्याध्यापक, झेड-ए. उर्दु हायस्कुल, मलकापुर हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार सदरची नोटीस संस्थेचे अध्यक्ष श्री.रशिद खान युसूफ खान जमादार यांचे स्वाक्षरीने दिली असल्याने ती माहिती त्यांचे अधिपत्याखाली असल्याचे म्हटले आहे. तरी, शिक्षणाधिकारी यांनी संबंधित अध्यक्षास तसा पत्रव्यवहार करुन कारणे दाखवा नोटीसची प्रत मागवावी व ती मिळाल्यानंतर अर्जदाराला देण्यात यावी.

**वरील सुचना व आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२७/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. प्रकाश लक्ष्मणराव शिरसाट,
अध्यक्ष, महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघ,
आनंदनगर, देविखदान, चंद्रप्रकाश निवास,
अकोला, जि.अकोला.

**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अकोला, जि.अकोला.
**२**. जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अकोला, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला श्री. पी.पी. महाजन हे हजर आहेत.

आज सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला श्री. पी.पी. महाजन हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार दिनांक १२/०९/२००९ ला प्रपत्र 'अ' नुसार अर्जदाराने माहिती मागितली. अर्जदाराचा अर्ज दिनांक १२/०९/२००९ चा आहे परंतु सदरचा अर्ज दि.१२/१०/२००९ ला प्राप्त झाला व त्यानंतर दिनांक ११/११/२००९ ला अर्जदाराला ११४८/- रु.चा भरणा करण्याबाबत पत्र दिले. त्यानंतर मागितलेली माहिती पुरविण्यात येईल असे सदरच्या पत्राने कळविले परंतु अर्जदाराने पैशाचा भरणा केला नाही व दिनांक २४/११/२००९ ला प्रथम अपिलीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले व त्यामध्ये माहिती मिळाली नाही असे कारण दाखविले आहे. त्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणात सुनावणी दिनांक ११/०१/२०१० रोजी १२.३० वाजता सुनावणी ठेवली. सुनावणी दरम्यान अर्जदार गैरहजर होते. सदर प्रकरणात अर्जदाराने दिनांक ११/०१/२०१० पुर्वी शुल्क भरलेला नसल्याने आवश्यक ती माहिती पुरविण्यात आली नाही व सुनावणीच्या तारखेपर्यंत सुध्दा पैसे भरलेले नाही या कारणावरुन अर्जदाराचे अपिल खारीज केले व तशा प्रकारचा लेखी खुलासा अपिलीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी हया आयोगासमोर दाखल केला. अर्जदार आज रोजी गैरहजर आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या व्दितीय अपिलाव्दारे हया आयोगासमोर अशी तक्रार केली की, अपिल निकालात काढले नाही व निर्णय मुदतीत दिला नाही. अर्जदार आज सुनावणीचे वेळी गैरहजर असल्यामुळे या बाबीची शहानिशा होवु शकली नाही परंतु उत्तरवादी यांनी लेखी पुरावा दाखल केल्यामुळे अपिल निकाली काढण्यात आले आहे व अर्जदाराने पैसे न भरल्यामुळे अर्जदाराला माहिती पुरविता आली नाही. तरी, अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराला माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढण्यात येते व अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १३२/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
कु.वर्षा रुपरावजी तिखिले,
व्दारा, विजय वामन पाऊलझगडे,
मु.पो. निमगांव, ता.नांदुरा, जि.बुलडाणा,
४४३४०४.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षणाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, बुलडाणा.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बुलडाणा.

**३.** जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
भाऊसाहेब साबणे विदयालय, घाटपुरी,
ता.खामगांव , जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी कु.वर्षा रुपरावजी तिखिले हया हजर आहेत. अपिलार्थी तर्फे ॲड. डब्ल्यु. डी. माहोरे, अमरावती हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.एस.ए. सोनुने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, भाऊसाहेब साबणे विदयालय, घाटपुरी, खामगांव श्री. जि.एस. वरणगांवकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने रिट पिटीशन क्रमांक २०२८/१९९७ हया पिटीशनची संपुर्ण कागदपत्रे शिक्षणाधिकारी यांना मागितली होती परंतु अर्जदाराला ती माहिती पुरविण्यात आली नाही. सदर प्रकरणात अर्जदाराने प्रथम अपिल दाखल केले व त्यामध्ये दिनांक २७/१०/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाला सदरची पिटीशनची प्रत उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांना अर्जदाराला हवी असलेली माहिती ८ दिवसात पुरवावी असे कळविले परंतु सध्या कार्यरत असलेले मुख्याध्यापक हे दिनांक ०१/०३/२०१० पासुन कार्यरत आहे व त्याआधी दुसरे मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत होते व त्यांचे म्हणण्यानुसार त्यांचे शाळेत सदरची पिटीशनची प्रत उपलब्ध नाही परंतु अर्जदाराच्या वतीने हया याचीकेतील दिनांक १२ नोव्हेंबर १९९८ ला अंतिम आदेश दाखल केला व त्यात स्टेट ऑफ महाराष्ट्र, डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, जॉईन डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांना प्रतिनिधी म्हणुन दाखविले आहे त्यामुळे शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेकडे सदर पीटीशनची प्रत असणे आवश्यक आहे. तरी याबाबत श्री.सोनुने, जन माहिती अधिकारी हे याबाबत चौकशी करुन संबंधित कार्यालयाकडुन याचिकेची प्रत प्राप्त करुन आजपासुन १५ दिवसाचे आंत अर्जदाराला देतील.

**वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १२९/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.भारत नागोराव भिंबरवाड,
पदवीधर शिक्षक, पंचायत समिती, महागांव ,
मु.पो. काळी (टेंभी), ता.महागांव, जि.यवतमाळ.
**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.
**२**. जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर दिनांक २९/०९/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले होते व त्यात माहिती न मिळाल्यामुळे व्दितीय अपिल दाखल करीत आहे असे म्हटले आहे. अर्जदाराने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे दाखल केलेल्या प्रपत्र 'अ' चे अवलोकन केले असता अर्जदाराला पंचायत समिती, महागांव अंतर्गत नियुक्ती दिनांक २१/०९/१९८७ रोजी देण्यात आली त्यावेळेस त्यांच्या नियुक्ती जाती प्रवर्गाची कागदपत्राच्या झेरॉक्स मिळण्याबाबत अर्जदाराने अर्ज केलेला आहे. ती माहिती न मिळाल्यामुळे अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल केले.

आज सुनावणीचे वेळी अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराला माहितीची आवश्यकता आहे किंवा नाही हे समजु शकले नाही . उत्तरवादी हे सुध्दा गैरहजर आहे.

सदरच्या कारणावरुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १३३/ २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.सुखदेव राघोजी शिंदे,
रा.मु.जुमडा, पो.सावरखेड भोई,
ता.देऊळगांवराजा, जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग बुलडाणा यांचे कार्यालय,
बुलडाणा.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी, (प्रादेशिक), यांचे कार्यालय,
देवुळगांवराजा, ता. देवुळगांवराजा, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक ०२/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.सुखदेव राघोजी शिंदे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग, बुलडाणा श्री.एस.एम. राठोड हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), देवुळगांवराजा श्री.एस.वाय. भालेराव हे हजर आहेत.

अर्जदाराला प्रपत्र 'अ' नुसार माहिती मिळाली नसल्यामुळे अर्जदाराने दिनांक २०/१०/२००९ रोजी प्रपत्र 'ब' दाखल केले. सदर प्रकरणात दिनांक १०/११/२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व त्याबाबत दिनांक ०४/११/२००९ नुसार सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत अर्जदारास नोटीस पाठविण्यात आली. अर्जदाराला नोटीस मिळाली नसल्यामुळे अर्जदार सुनावणीस हजर राहु शकले नाही. सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा दिनांक ०५/०१/२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली. त्यानंतर दिनांक २५/०२/२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली व दिनांक २५/०२/२०१० रोजी आदेश पारित केला व त्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०१/०९/२००९ च्या अर्जामध्ये नमुद केलेली माहिती ३० दिवसाचे कालावधीत उपलब्ध करुन देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केलेली आहे, त्यामुळे त्यांना कडक समज देण्यात आली आहे. तरी, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी २५ मार्च २०१० पर्यंत माहिती उपलब्ध करुन तसा अहवाल अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयास सादर करावा असे म्हटले आहे. त्यानुसार दिनांक २५/०४/२०१० रोजी अर्जदाराला पोष्टाने माहिती पुरविण्यात आली. अर्जदाराचे म्हणण्यानुसार सदरची माहिती अपुर्ण आहे व जी माहिती आवश्यक नाही ती माहिती पुरविण्यात आली.

वरील घटनाक्रम व अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता अर्जदाराला दिनांक २५/०३/२०१० पर्यंत माहिती देणे अपेक्षित होते परंतु माहिती देण्याकरिता एक महिन्याचा कालावधी जास्त लागला आहे. त्यामुळे अर्जदाराच्या मुळ अर्जापासुन जवळ-जवळ ७ महिन्यानंतर अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली आहे ही बाब लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.व्ही.जी. साबळे व श्री.व्हि.एन. सातपुते यांना दोषी ठरविण्यात येते व त्यांना लागु असलेल्या शिस्तभंग विषयक कार्यवाहीची शिफारस या अधिनियमाच्या कलम २०(२) नुसार ठरविण्यात येते. तरी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.व्ही.जी. साबळे व श्री.व्हि.एन. सातपुते यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करुन ३ महिन्याच्या आत अहवाल या आयोगास सादर करावा. तसेच अर्जदार यांना हया आयोगासमोर मागितलेली मौजा गिरोली, पळसखेड झाल्टा व महारखेड येथील मजुरांच्या नावाची यादी व रोपलागवडीबाबतच्या मजुरांच्या नावाची यादी

तसेच त्या विभागाची कामे करणा-या मजुरांच्या कामाची माहिती अर्जदाराला २०/११/२०१० ला सकाळी ११.०० वाजता अर्जदारास विनाशुल्क माहिती देण्यात यावी.

खालील आदेश पारित करुन अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

१. उपवनसंरक्षक, वनविभाग, बुलडाणा यांनी वर शिफारस केल्यानुसार वन परिक्षेत्र अधिकारी श्री.व्ही.जी. साबळे व श्री.व्हि.एन. सातपुते यांचेविरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमांचा भंग केल्याच्या कारणावरुन त्यांचेवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करुन ३ महिन्याचे आंत या आयोगास अहवाल सादर करावा.

२. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार जी माहिती मिळाली नाही ती माहिती विनाशुल्क दिनांक २०/११/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता पुरविण्यात यावी.

**वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.**

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**प्रत,**

**उपवनसंरक्षक, वनविभाग, चिखली रोड, बुलडाणा, यांना कार्यवाहीसाठी अग्रेषित.**